**ठळक बातम्या**

- देशातली ७ राज्य आणि २ केंद्रशासित प्रदेशांच्या स्थापनादिनानिमित्त आज विशेष कार्यक्रम

- केंद्र सरकारच्या हमीभाव योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन खरेदीला राज्यात येत्या १५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार

- मतचोरी आणि मतदार याद्यांमधे घोळ असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीचा आज मुंबईत मोर्चा

- देशभरात व्यावसायिक वापराच्या गॅसच्या किंमतीत घट

**आणि**

- आशियाई युवा क्रीडास्पर्धांमध्ये भारताची ४८ पदकांची कमाई / पुण्याच्या चंद्रका पुजारीला मुष्टियुद्ध स्पर्धेत सुवर्णपदक

**<><><><><>**

देशातली ७ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेश आज स्थापना दिवस साजरा करत आहेत. आंध्र प्रदेश, छत्तीसगड, हरियाणा, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, आणि पंजाब ही राज्य तसंच लक्षद्वीप, आणि पुदुच्चेरी हे केंद्रशासित प्रदेश १ नोव्हेंबर रोजी स्थापन झाले. स्थापना दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिथल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व राज्यांनी देशाच्या प्रगतीत उल्लेखनीय योगदान दिलं असून, त्याची विकास यात्रा सातत्याने नवी शिखरं पार करत राहो, अशी इच्छा राष्ट्रपतींनी व्यक्त केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत.

या सर्व ठिकाणी राज्य स्थापनादिनानिमित्त कार्यक्रम होत आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी छत्तीसगढ च्या दौऱ्यावर असून ते राज्यस्थापनादिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते छत्तीसगडमध्ये 14 हजार 260 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आज झाली. नवा रायपूर अटलनगर इथं

छत्तीसगड विधानसभेच्या नव्या इमारतीचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. हरित इमारत संकल्पनेवर बांधलेली ही रचना सौरऊर्जेवर चालण्यासाठी तयार केली असून त्यात पावसाचं पाणी साठवण्याच्या व्यवस्थेचा समावेश आहे. माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याचं अनावरणही मोदी यांनी केलं.

याखेरीज प्रधानमंत्र्यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी संस्थेच्या शांतिशिखराचं तसंच वीर नारायण सिंग स्मारक आणि आदिवासी स्वातंत्र्यसैनिक वस्तुसंग्रहालयाचं उद्घाटन केलं. श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयाला भेट दिली तसंच दिल की बात कार्यक्रमाद्वारे सुमारे अडीच हजार बालरुग्णांशी संवाद साधला.

<><><><><>

केंद्र सरकारच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन पिकांच्या खरेदीला येत्या १५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार असून त्यासाठी शेतकऱ्यांना ॲपद्वारे किंवा खरेदी केंद्रांवर ऑनलाईन नोंदणी करता येईल. या नोंदणीला 30 ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे तर अंतिम मुदत ३१ डिसेंबर आहे. खरेदीचा कालावधी १५ नोव्हेंबरपासून पुढील ९० दिवसांसाठी असेल. शेतकऱ्यांनी नजीकच्या खरेदी केंद्रावर नोंदणी करण्यासाठी कागदपत्रांसह अर्ज करावा आणि नाफेडच्या धान्य खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन पणन अधिकाऱ्यांनी केलं आहे.

<><><><><>

भारतीय अन्न महामंडळाच्या महाराष्ट्रातल्या प्रादेशिक कार्यालयानं ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून ‘खुला बाजार विक्री योजने’ अंतर्गत तांदळाची विक्री सुरू केली आहे. खरेदीदारांनी अन्न महामंडळाच्या ई-लिलावात बोली लावावी, असं आवाहन महामंडळाने केलं आहे. येत्या ६ आणि ७ नोव्हेंबर रोजी तांदळाचा ई-लिलाव होणार असून, यासाठी एकूण १० हजार मेट्रिक टन तांदूळ उपलब्ध केला जाईल असं यात म्हटलं आहे.

किमान बोली १ मेट्रिक टन, तर प्रति बोलीदार ७हजार मेट्रिक टनांची कमाल मर्यादा आहे.

अन्नधान्याच्या वाढत्या बाजारभावांवर नियंत्रण ठेवणं आणि खुल्या बाजारात पुरेशी उपलब्धता निर्माण करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणं, हे ‘खुला बाजार विक्री’ योजनेचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

मतचोरी आणि मतदार याद्यांमधील घोळाचा आरोप करत महाविकास आघाडीनं आज मुंबईत सत्याचा मोर्चा काढला आहे. या मोर्चात जेष्ठ नेते शरद पवार यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे, सुप्रिया सुळे, सतेज पाटील, विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे सहभागी झाले आहेत. सोबतच डाव्या पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते देखील मोर्चात सहभागी झाले आहेत. आघाडीतल्या पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येनं मोर्चात सहभागी झाले आहेत. सदोष मतदार याद्यांची दुरुस्ती झाल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेतल्या जाऊ नयेत अशी महाविकास आघाडीची मागणी आहे.

हा मोर्चा सत्याचा नव्हे तर सत्तेचा आहे अशी टीका भाजपानं केली आहे.

**<><><><><>**

देशभरात व्यावसायिक वापराच्या गॅसच्या किंमतीत आजपासून घट झाली आहे. घरगुती वापराच्या १४ किलो २०० ग्रॅम वजनाच्या एल पी जी सिलेंडरच्या किंमतीत मात्र कोणताही बदल झालेला नाही. व्यावसायिक वापराच्या १९ किलो वजनाच्या गॅस सिलेंडरच्या किंमतीत साडे चार ते साडे सहा रुपयांपर्यंत घट झाली असून यानुसार आता मुंबईत हा सिलेंडर १ हजार ५४२ रुपयांना मिळेल.

**<><><><><>**

प्रसार भारती आणि केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयानं आयोजित केलेल्या ६७व्या आकाशवाणी संगीत संमेलनाचं उद्या मुंबईत  उद्घाटन होणार आहे. आकाशवाणी मुंबईच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित अरुण कशाळकर उपस्थित राहणार आहेत. हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायक पद्मश्री पंडित वेंकटेश कुमार आणि प्रसिद्ध भारूड कलाकार हामिद अमीन सय्यद आणि त्यांचं पथक आपली कला सादर करणार आहेत. . आकाशवाणी संगीत

संमेलन प्रसिद्ध आणि उदयोन्मुख संगीतकार आणि गायकांसाठी एक महत्त्वाचं व्यासपीठ मानलं जातं. दिल्ली आणि चेन्नई इथंही उद्घाटनाचे कार्यक्रम होणार आहेत.

<><><><><>

बहरीन मध्ये सुरु असलेल्या आशियाई युवा क्रीडास्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत ४८ पदकांची कमाई केली आहे. यामध्ये १३ सुवर्ण, १८ रौप्य आणि १७ कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत भारताच्या २२२ खेळाडूंनी भाग घेतला होता. भारताच्या महिला संघानं कबड्डीमध्ये सुवर्णपदक पटकावलं, पुण्याची चंद्रिका पुजारी हिने मुष्टियुद्ध स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं, तर भारोत्तोलन आणि बीच रेसलिंग प्रकारात खेळाडूंनी केलेली कामगिरी लक्षणीय ठरली.

<><><><><>

आय सी सी महिला विश्वचषक स्पर्धेत भारताची अंतिम लढत दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. हा सामना नवी मुंबईच्या डी वाय पाटील मैदानावर होणार आहे. उद्या सकाळी साडेनऊ वाजता खेळ सुरु होईल.

<><><><><>

भारताचा अग्रणी टेनिसपटू रोहन बोपण्णा यानं व्यावसायिक टेनिसमधून निवृत्ती जाहीर केली आहे. बोपण्णानं समाजमाध्यमावर ही घोषणा केली आहे. २० वर्षांच्या कारकिर्दीनंतर आता आपण रॅकेट टांगण्याची वेळ आल्याचं त्यानं म्हटलं आहे.

<><><><><>

महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकानं मुंबई विमानतळावर एका विशेष कारवाईत ४ किलो ७०० ग्रॅम कोकेन जप्त केलं. आंतरराष्ट्रीय बाजारात या कोकेनची किंमत अंदाजे ४७ कोटी रुपये आहे. या प्रकरणात आतापर्यंत पाच संशयितांना अटक करण्यात आली आहे. कोलंबोहून येणाऱ्या एका महिलेकडून कॉफी पावडरच्या पाकिटात हा अमली पदार्थ लपवलेला होता. त्यानंतर त्या महिलेला तसंच चौकशीनंतर आणखी चार संशयितांना अटक करण्यात आली.

<><><><><>

मुंबईच्या बोरिवली या उपनगरातल्या देवीपाडा मेट्रो स्थानकाजवळ पश्चिम द्रुतगती मार्गावर आज सकाळी एका चारचाकीला आग लागली. आग लागल्याचं लक्षात येताच

चालक वाहनातून खाली उतरल्यानं दुर्घटना टळली. मात्र, या मार्गावरची वाहतूक काही काळासाठी खोळंबली होती. पोलीस आगीच्या कारणांचा शोध घेत आहेत.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या बोईसर-तारापुर एमआयडीसी मधल्या गालिचे आणि दोऱ्या तयार करणाऱ्या एका कारखान्याला काल संध्याकाळी आग लागली. या दुर्घटनेत कारखान्यातले ४ मजूर भाजले असून त्यांच्यावर ऐरोली आणि बोईसरमधल्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पोलीस आगीच्या कारणांचा शोध घेत आहेत.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशच्या श्रीकाकुलम जिल्ह्यातल्या श्री वेंकटेश्वर स्वामी मंदिरात आज झालेल्या चेंगराचेंगरीत ९ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे, तर अनेकजण जखमी झाले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आंध्र प्रदेशचे राज्यपाल एस. अब्दुल नजीर, मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

देशभरात आता हिवाळ्याची चाहूल लागत असून हिमाचल प्रदेशात रात्रीचं तापमान खाली आलं असून येत्या मंगळवार बुधवारी हिमवर्षावाची शक्यता आहे.

बंगालच्या उपसागरावरच्या कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव कमी होत आहे. येत्या मंगळवारपासून पाऊस ओसरेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

राज्यात कोकणातले सर्व जिल्हे तसंच कोल्हापूर, सातारा आणि नाशिक जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

**//<><><><><>//**